# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

### मंगळवार, दिनांक ६ डिसेंबर, २०१६

### (दुपारी १२.०० वाजता)

**एक** : **नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी.**

**दोन** : **प्रश्नोत्तरे -**

**(क)** **तारांकित प्रश्न.**

**(ख)** **सोमवार, दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**तीन** : **(अ)** **अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**(१) मुख्यमंत्री** : **(क)** 'सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक १६ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१६' सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** 'सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक १७ - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१६' सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** 'सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक २२ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पुढे चालू ठेवणे)

अध्यादेश, २०१६‘सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** ‘सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक २६ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०१६‘ सभागृहासमोर ठेवतील.

**(२) वित्त मंत्री** : **(क)** ‘सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक २३ - महाराष्ट्र विवादीत थकबाकी तडजोड (सुधारणा) अध्यादेश, २०१६‘ सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** ‘सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक २४ - महाराष्ट्र विवादित थकबाकी तडजोड (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०१६‘ सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** ‘सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक २७ - महाराष्ट्र विवादीत थकबाकी तडजोड (तिसरी सुधारणा) अध्यादेश, २०१६" सभागृहासमोर ठेवतील.

**(३) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : ‘सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक २५ - महाराष्ट्र विद्यापीठ (निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे आणि विद्यापीठ प्राधिकरणे व इतर मंडळे तदर्थ घटित करणे) अध्यादेश, २०१६‘ सभागृहासमोर ठेवतील.

**(४) जलसंपदा मंत्री** : ‘सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक २१ - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश,

२०१६' सभागृहासमोर ठेवतील.

**(५) सहकार व पणन मंत्री** : **(क)** 'सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक १८ - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) अध्यादेश, २०१६' सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** 'सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक १९ - महाराष्ट्र सहकारी संस्था (चौथी सुधारणा) अध्यादेश, २०१६' सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** 'सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक २० - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१६' सभागृहासमोर ठेवतील.

**(ब) अध्यादेश मागे घेतल्याबाबतचे मा.राज्यपालांचे आदेश सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**सहकार मंत्री** : **(क)** 'सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक १८ - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) अध्यादेश, २०१६' मागे घेतल्याबाबत मा. राज्यपालांचे आदेश सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** 'सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक १९ - महाराष्ट्र सहकारी संस्था (चौथी सुधारणा) अध्यादेश, २०१६' मागे घेतल्याबाबत मा. राज्यपालांचे आदेश सभागृहासमोर ठेवतील.

**चार** : **दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राष्ट्रपती/राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचे जाहिर करण्यात येईल.**

**पाच** : **म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना – असल्यास.**

**सहा** : **लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

(१) **सर्वश्री. संजय दत्त**, हेमंत टकले, धनंजय मुंडे, नरेंद्र पाटील, ॲड. निरंजन डावखरे, श्री. किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. रामराव वडकुते, अशोक ऊर्फ भाई जगताप, शरद रणपिसे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :–

'मुंबईतील फोर्ट येथील बॉम्बे हाऊसमध्ये टाटा समुहाच्या सुरक्षारक्षकांनी 'मिडे डे' चे ज्येष्ठ फोटोग्राफर अतुल कांबळे, 'टाइम्स ऑफ इंडिया' चे शांतकुमार आणि 'हिदुस्थान टाइम्स' चे हरजित सिंह या वृत्तपत्रकार छायाचित्राकारांना मारहाण केल्याचा प्रकार दिनांक ४ नोव्हेंबर, २०१६ च्यासुमारास उजेडात येणे राज्यातील पत्रकारांवरील वाढते हल्ले, पत्रकारांवर खोटे गुन्हे दाखल करुन हितसंबंधियांकडून त्यांची मुस्कटदाबी करण्याचा सातत्याने होत असलेला प्रयत्न आणि ज्येष्ठ पत्रकारांना पेन्शन देण्यास शासनाकडून होत असलेली टाळाटाळ यामुळे दिनांक २ ऑक्टोबर, २०१६ रोजी पत्रकारांतर्फे राज्यभर मूक मोर्चा काढण्यात येणे, राज्यात पत्रकारांवर हल्ला व धक्काबुकी करण्याचे प्रकार वाढत असून मागील काही अधिवेशनात यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला असता पत्रकारांवर होणारे हल्ले व त्यांच्या इतर विविध मागण्या तातडीने सोडविण्यात येतील असे आश्वासन शासनाने दिलेले असणे, परंतु सदर आश्वासनाची अंमलबजावणी करण्यात शासनाला येत असलेले अपयश, पत्रकारांना हक्काचे घर मिळावे, संरक्षण मिळावे, विमा योजना लागू करावी अशा विविध मागण्या प्रलंबित असणे, पत्रकार राज्यात जनजागृतीची महत्वाची भूमिका बजावत असताना जीव धोक्यात घालत असणे, त्यांच्या संरक्षणाकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे पत्रकारांमध्ये शासनाबाबत तीव्र असंतोष निर्माण होणे, शासनाने

महाराष्ट्रातील पत्रकारांना हक्कांचे घर मिळावे, संरक्षण मिळावे, विमा योजना लागू करावी याबाबत तातडीने निर्णय घेऊन पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.'

(२) **श्री. गोपिकिशन बाजोरीया**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

'अकोला शिवणी विमानतळाच्या धावपट्टीचे विस्तारीकरणाकरिता दिनांक २३ मे, २०१६ रोजी डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यांच्या ६०.६८ हेक्टर जमिनीचा ताबा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतलेला असणे, विमानतळ विस्तारीकरणाकरिता संपादीत करावयाच्या ३४.०६ हे.आर खाजगी जमीनीवरील शेती क्षेत्र,अकृषक क्षेत्रे, गुंठेवारी क्षेत्र, पक्की घरे, कच्ची घरे यांचे मुल्यांकन मागविण्यात येणे, खाजगी जमिनीचे भूसंपादनाला अंदाजे १०९ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद आवश्यक असणे, पश्चिम विदर्भाच्या व अकोला शहराच्या जलद औद्योगिकरणाच्या दृष्टीने अकोला येथे विमानतळ होणे अत्यंत गरजेचे असणे, याकरिता खाजगी जमिनीचे भूसंपादन करणे व लागणाऱ्या इतर खर्चाकरिता अंदाजे १०९ कोटी रुपयांची असलेली आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर विमानतळाच्या धावपट्टीचे विस्तारीकरणाचे काम तातडीने पूर्णात्वास नेण्याकरिता १०९ कोटी रुपयांचा निधी तातडीने उपलब्ध करुन देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.'

(३) **सर्वश्री. सुजितसिंह ठाकूर**, रविंद्र फाटक, प्रा. जोगेन्द्र कवाडे, डॉ. नीलम गोऱ्हे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

'नवी मुंबई, खारघर सेक्टर १० मधील "पुर्वा डे-केअर अँड प्ले स्कूल" या पाळणाघरात, मुलांची निगा राखण्यासाठी ठेवलेल्या, अफसाना शेख या आयाने, १० महिन्यांच्या बाळाला अमानुषपणे मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक २१

नोव्हेंबर, २०१६ रोजी उघडकीस येणे, आई-वडील दोघेही नोकरी करीत असल्यामुळे, सदर बाळाला पाळणाघरात ठेवण्यात येत असणे, सदर प्रकरण सीसीटीव्हीद्वारे निदर्शनास आल्यावर, बाळाच्या आईने दिनांक २३ नोव्हेंबर, २०१६ रोजी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात येऊनही पोलीसांनी आरोपी विरुध्द ठोस कारवाई न करणे, पिडित बाळास उपचारासाठी, नवी मुंबईतील हिरानंदानी फोर्टीस रुग्णालयात दाखल केले असता फ्रॅक्चर असल्याचे आढळून येणे, सदर पाळणाघरात इतर बाळांबरोबर देखील असाच प्रकार घडण्याची शक्यता असणे, यामुळे पाळणाघरात बाळांच्या सुरक्षिततेबाबत निर्माण झालेले प्रश्नचिन्ह, यामुळे मुंबईसह राज्यातील, पाळणाघरांमध्ये मुलांच्या संगोपनाबाबत निर्माण झालेली अविश्वासाची भावना, परिणामी मुलांना पाळणाघरात ठेऊन नोकरी करणा-या पालकांमध्ये निर्माण झालेले चिंतेचे वातावरण, राज्यातील सर्व पाळणाघरांमध्ये बाळाची निगा, संगोपन व सुरक्षा उपलब्ध करुन देण्याबाबत राज्य शासनाने प्ले स्कूलबाबत, धोरण बनवून त्याची त्वरित अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, पाळणाघरांची नोंदणी करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया.'

(४) **सर्वश्री. धनंजय मुंडे**, जयवंतराव जाधव, हेमंत टकले, सुनिल तटकरे, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री. नरेंद्र पाटील, किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. रामराव वडकुते, आनंद ठाकूर, प्रकाश गजभिये, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **पणन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

'गेल्या आठ महिन्यांपासून घाऊक बाजारात कांदा कमाल आठ ते किमान तीन रुपये किलोपर्यंत घसरुनही शासनाने कोणतीही उपाययोजना न करणे, दोन महिन्यांपूर्वी शासनाने जाहिर केलेले प्रतिकिलोला अवघे एक रुपयांचे अनुदानही

अद्याप शेतकऱ्यांच्या हाती पडलेले नसणे, उन्हाळी कांदा विक्रीतून उत्पादन खर्चही न निघाल्याने लागवडीसाठी अनेकांकडे पैसे नसणे, सटाणा बाजार (जि.नाशिक) समितीत दुय्यम प्रतीच्या कांद्याला २५ रुपये क्विंटल अर्थात २५ पैसे किलो भाव जाहीर झाल्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी सटाणा-मालेगाव रस्त्यावर कांदा फेकून नुकतेच केलेले तीव्र आंदोलन, मातीमोल भावात खरेदी करतांना काही कांदा व्यापाऱ्यांनी खरेदीला नकार देणे, व्यापाऱ्यांच्या मनमानी कारभाराचा शेतकऱ्यांनी केलेला निषेध, कांद्याचे भाव गडगडण्याची मालिका अद्यापही कायम असून मागील चार ते पाच महिन्यात ८०० ते १००० रुपयांच्या दरम्यान असणारे कांद्याचे भाव मागील काही दिवसात प्रति क्विंटलला ४०० रुपयांपर्यंत घसरलेले असणे, त्यातच व्यापाऱ्यांच्या संपामुळे महिनाभर कांद्याचे लिलाव बंद असणे, त्यातच यावर्षी कांद्याचे झालेले जादा उत्पादन, सरकारच्या अनास्थेमुळे शेतकऱ्यांना उत्पादन खर्चापेक्षाही कमी भाव मिळत असणे, शेतकऱ्यांचे कांदे हमी भावाने खरेदी करणे आवश्यक असणे, ज्या काळात निर्यात करावयाची त्या काळात निर्यात न केल्याने ही परिस्थिती ओढवलेली असणे, जिल्हा बँक व सोसायटी कर्ज देण्यास तयार नसणे, ही विचित्र स्थिती आणि गडगडलेले भाव, यामुळे विहिरीचे पाणी असूनही नव्याने लागवड करताना अनेक शेतकऱ्यांची दमछाक होणे, याचा परिणाम नव्याने येणारे उत्पादन आणि बाजार भावावर होणे, पाच ते सहा महिन्यांपासून कांद्याचे उत्पादन घेणारा शेतकरी भरडला जात असूनही शासनाची त्यांना मदत देण्याची मानसिकता नसणे, याबाबत कांदा उत्पादन शेतकऱ्यांमध्ये पसरलेला कमालीचा संताप, याबाबत शासनाची भूमिका व शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही.'

**सात : म.वि.प. नियम १०१ - अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

**आठ : सभागृह नेते यांचा प्रस्ताव -**

"महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतदादा बंडुजी पाटील यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्यसाधून त्यांनी महाराष्ट्र राज्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल ही विधानपरिषद कृतज्ञता व्यक्त करीत आहे."

# - मध्यंतर -

नऊ : **श्री.प्रविण दरेकर**, डॉ.नीलम गोऱ्हे, विनायक मेटे, श्रीमती स्मिता वाघ, सर्वश्री.गोपीकिसन बाजोरिया, सुजितसिंह ठाकूर, रविंद्र फाटक, प्रा.अनिल सोले, सर्वश्री.गिरीश व्यास, प्रशांत परिचारक, डॉ.अपूर्व हिरे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** -

"महाराष्ट्रामध्ये बहुसंख्येने असणाऱ्या मराठा समाजाची अनेक वर्षापासून आरक्षणाची मागणी असणे, परंतु या मागणीकडे सातत्याने दुर्लक्ष होणे, मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देण्याच्या निर्णयाला उच्च न्यायालयात स्थगिती मिळणे, उच्च न्यायालयात मराठा आरक्षणाची बाजू भक्कमपणे मांडण्यासाठी पुरावे व सांख्यिकी माहिती गोळा करण्यासाठी मराठा आरक्षण समिती गठीत करणे, महाराष्ट्रभर जिल्ह्या-जिल्ह्यात मराठा समाजाचे प्रचंड शांततापूर्ण, शिस्तबध्द, मूक क्रांती मोर्चे निघणे, प्रस्थापित मराठा नेतृत्वाकडून झालेल्या अन्यायाविरोधातील आपल्या भावना ह्या मोर्च्यातून व्यक्त होणे, राज्य शासनाने आर्थिकदृष्ट्या मागास वर्गाची उत्पन्न मर्यादा ६ लाखापर्यंत वाढविली असणे, तसेच सर्व आर्थिक दुर्बल घटकांसाठी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना सुरू करणे, याशिवाय अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या माध्यमातून स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे, कोपर्डी प्रकरणातील अत्याचार लक्षात घेता सदर प्रकरण जलदगतीने न्यायालयात चालवून पिडीत महिलेला न्याय देण्याचा प्रयत्न करणे, मराठा समाजाच्या भावना लक्षात घेऊन शासनाने सुरू केलेल्या योजना व त्यावरील जनतेची असणारी प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

**दहा** : **अर्धा-तास चर्चा – म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) –**

(१) **डॉ. (श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.**

**"पाटणकर चौक, जरीपटका (जि.नागपूर) येथील बालसुधारगृहातून मुले पळून गेल्याबाबत"** या विषयावरील डॉ. (श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २३०३८ ला दिनांक २५ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(२) **श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.**

**"बीड जिल्ह्यातील विद्युत अपघातामध्ये मृत्यूमुखी पडलेल्यांच्या वारसांना आर्थिक मदत देण्याबाबत"** या विषयावरील श्री. अमरसिंह पंडित व इतर वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २२४४६ ला दिनांक १९ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
**नागपूर,**
**दिनांक : ५ डिसेंबर, २०१६.**

**उत्तमसिंग चव्हाण,**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**